वरिष्ठ पोलीस निरीक्षक शांतीनगर, पोलीस ठाणे, भिवंडी

20

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

1. **District (जिल्हा):** ठाणे शहर  **P.S.(ठाणे):** शांती नगर

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0408  **Year (वर्ष):** 2023

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 01/06/2023 19:06

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** गुरूवार  **Date From (दिनांक पासून):** 01/06/2023
**Time Period (कालावधी):** पहर 5  **Date To ( दिनांक पर्यंत):** 01/06/2023
**Time From (वेळेपासून):** 13:09 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 13:09 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 01/06/2023  **Time (वेळ):** 18:00 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 039

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 01/06/2023 18:55 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

पूर्व, 02 किमी  **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** पुरवठा विभाग,तहसिल कार्यालय ,भिवंडी जि ठाणे

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): अँड. कुमार विठ्ठल उतारडे

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1990

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | खोणीगाव, ता भिवंडी जिठाणे,ठाणे शहर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | खोणीगाव, ता भिवंडी जिठाणे,ठाणे शहर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-9763333306

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | लोकसेवीका सौ. सिंधु उमेश खाडे | | | 1. रूम नं 205 बि विंग,मयुर पंख सोसायटी, कळवा ठाणे,ठाणे शहर,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

**10 Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

**11. Inquest Report / U.D. case No., If any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12. First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

मी अँड. कुमार विठ्ठल उतारडे वय 33 वर्षे व्यवसाय वकील, रा. खोणीगाव, ता. भिवंडी जि.ठाणे मो.नं. 9763333306 समक्ष शांतीनगर पोलीस स्टेशन येथे हजर राहून फिर्याद लिहुन देतो की,

मी, वरील पत्त्यावर माझे कुटुंबासह रहावयास असुन खोणी हे माझे मुळ गाव आहे. मी, मागील 06 वर्षांपासुन भिवंडी येथील दिवाणी, फौजदार तसेच महसुल न्यायविभागात वकीलीचा व्यवसाय करीत आहे. माझे व्यवसायाचे माध्यमातुन माझे अशील एस.के.डब्ल्यु. फर्म आणि कंपनी तर्फे प्रोप्रा. श्रीमती संगिता देसाई व इतर यांचे महसुल न्यायालय भिवंडी येथे फेरफार संबंधी हरकत प्रकरण क्रमांक 112/2023 हे प्रकरण प्रलंबित आहे. सदर प्रकरणाचे वकीलपत्र माझेकडे आहे सदर प्रकरणाचे कामकाज मी स्वतः पाहीलेले असुन सदर प्रकरण दि.27/04/2023 रोजी बंद करण्यात आले आहे, त्याचा अंतिम न्याय निर्णयाची प्रत अदयाप मला अथवा माझे अशीलास देण्यात आली नाही.

सदरचा न्यायनिर्णय देण्याकरीता व त्याबाबतचे आदेश पारीत करण्याकरीता नायब तहसिलदार सौ.खाडे मॅडम या माझेकडे 1,50,000/-रू. ची मागणी करीत असुन सौ. खाडे मॅडम यांनी मला दि.29/05/2023 रोजी भेट घेण्यास सांगितले होती.

मी, माझे काम कायदेषीर मार्गाने करीत असुन माझे कामाकरीता मला कोणासही लाच देण्याची इच्छा नव्हती. मी नायब तहसिलदार सौ. खाडे मॅडम यांना त्यांचे मागणीप्रमाणे लाचेची रक्कम दिली नाही तर ते अंतिम न्याय निर्णय देण्यात नाहक विलंब करतील म्हणुन माझेकडे लाचेची मागणी करणाऱ्या नायब तहसिलदार सौ.खाडे मॅडम यांचे विरूध्द लाचलुचपत कायदयान्वये योग्य ती कारवाई होण्यासबाबत मी दि.29/05/2023 रोजी अँन्टी करप्शन ब्युरो, ठाणे कार्यालयात लेखी तक्रारी अर्ज दिला होता.

मी दिलेल्या तक्रारीच्या अनुशंगाने पोलीस निरीक्षक श्री. सुरेश गणपत चोपडे, अँन्टी करप्शन ब्युरो, ठाणे यांनी लागलीच दोन शासकीय पंच उपलब्ध करून घेतले व माझेकडे डिजीटल व्हाईस रेकॉर्डर देवुन मला शासकीय पंच श्री.रत्नाकर पाटील यांचेसह लोकसेविका सौ.खाडे यांचे शिधा पुरवठा अधिकारी तथा नायब तहसिलदार कार्यालय, भिवंडी येथे पाठविले त्यावेळी लोकसेविका नायब तहसिलदार सौ.खाडे यांनी माझेशी माझे कामाबाबत चर्चा करून माझे कामाची फाईल पाहुन ''एकशे बारा आहे ना.....तुषार पाटोळे, कमलाकर पाटील.............. आणि.. एसकेडब्लु फर्म कंपनी तर्फे प्रोप्रायटर कु. संगिताजी देसाई ना.? पुर्णातील आहे..एकशे सत्तर ऑब्लीक सहा सर्वे नंबर आहे....... '' असे विचारले मी होकार दिल्यावर त्यांनी माझेकडे पाहुन ''आपलं काय?'' असे बोलुन लाचेच्या रकमेबाबत मला विचारले, त्यावर मी त्यांनाच '' मॅडम तुमच काय सांगाना मॅडम '' विचारले असता खाडे मॅडम यांनी मला पक्षकाराचे तयारी बाबत विचारले. त्यावर मी त्यांना त्यांचे काय म्हणने आहे याबाबत विचारणा केली व '' पुर्णा माहित आहे ना, पुर्णा किती डेव्हलप झाला ते............दिड बोल, दिड बोलुन टाक... असे बोलुन माझेकडे दिड लाख रूपये लाचेची मागणी केली. त्यावर मी रकमेची खात्री करण्याकरीता '' दिड किती?...... दिड लाख?'' असे पुन्हा विचारले असता खाडे मॅडम यांनी होकार दिला. मी त्यांना पक्षकार एवढी रक्कम देणार असे शक्य वाटत नसल्याचे सांगितल्यावर पुर्णा गाव कीती डेव्हलप असल्याचे पक्षकाराला पटवुन सांगण्यास सांगितले. त्यानंतर सौ. खाडे यांनी मला उदया सकाळी रक्कम घेवुन येण्यास सांगितले त्यावर मी त्यांना माझे क्लायंटला घाई असल्याचे सांगुन कधीपर्यत काम होईल याबाबत विचारले असता त्यांनी ''लगेच होईल..... ताबडतोब ऑर्डर निघेल...... दिड दिलात तर झालच.....आणि एक दिलात तर एखाद दिवस जाईल'' असे बोलुन दिड लाख रूपये दिल्यास लागलीच आर्डर काढणार व एक लाख रूपये दिल्यास एक दिवस जाईल असे सागुन माझेकडे दिड लाख रूपये लाचेची मागणी केली, व पक्षकारास पटवुन सांगितले तर पाच मिनिटात ऑर्डर त्यांचे हातात देणार असल्याचे सांगितले.

अषाप्रकारे दि.29/05/2023 रोजी पो.नि. श्री.सुरेश चोपडे यांनी पंच साक्षीदारा समक्ष केलेल्या पडताळणी दरम्यान लोकसेविका सौ. खाडे, नायब तहसिलदार यांनी माझेकडे माझे अशील एसकेडब्ल्यु फर्म आणि कंपनी तर्फे प्रोप्रा. श्रीमती देसाई आणि इतर यांचे फेरफार संबंधी हरकत प्रकरण क्रमांक 112/2023 या प्रकरणाचा निर्णय

देण्याकरीता 1,50,000/-रू. लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले.

सदरचे पडताळणीचे अनुशंगाने पो.नि.सुरेश चोपडे यांनी आज दि. 01/06/2023 रोजी माझेकडे उपलब्ध असलेल्या रकमेपैकी मी सापळा कारवाई करीता हजर केलेल्या 50,000/- रूपये त्यात 500/- रूपये दराच्या 100 नोटांना अँन्थ्रासिन पावडर लावुन सदरच्या नोटां ठेवलेला कागदी लिफाफा माझेकडे देवुन मला शासकीय पंच साक्षीदार श्री.पाटील यांचेसह लोकसेविका सौ. खाडे नायब तहसिलदार यांचे भिवंडी तहसिलदार कार्यालयात पाठविले. त्यावेळी मी सौ.खाडे यांना काल येवुन गेल्याचे तसेच माझे पार्टीसोबत बोलणे झाले व पार्टीने ऑलरेडी खुप लेट झाल्याचे व दिड लाख रूपये खुप जास्त होत असुन एक लाखापर्यंत पार्टीचे म्हणणे असल्याचे सांगितले. त्यावर खाडे मॅडम मला " अस होतच नाही कधी, तुम्ही वकील आहात" असे बोलेल्या त्यावर मी " तो बोलतोय ऑलरेडी डिले झालय..पंन्नास बोलतोय घेवून जा, दिलेत म्हणजे पन्नास ऑर्डर झाले की, ताबडतोब देतो बोलले" असे सांगितले त्यावर " तु फोन करून सांगुन ठेवायच एव्हड नाही कमी" असे सांगुन कमी रक्कम आणल्याबद्दल नाराजी व्यक्त केली, त्यावर मी "पन्नास दिलेत त्यांनी अँडव्हान्स" असे बोलुन लाचेची रक्कम आणली असल्याबाबत सांगितले असता खाडे मॅडम या " आणले ना.. आणा इथे" असे बोलुन माझेकडुन अँन्थ्रासिन पावडर लावलेली 50,000/- रूपये लाचेची रक्कम माझे अशील एसकेडब्ल्यु फर्म आणि कंपनी तर्फे प्रोपा. श्रीमती देसाई आणि इतर यांचे फेरफार संबंधी हरकत प्रकरण क्रमांक 112/2023 या प्रकरणाचा निर्णय देण्याकरीता 50,000/-रू. लाचेची स्विकारली असता लोकसेविका सौ.सिंधु उमेश खाडे, वय-52 वर्षे, नायब तहसिलदार व पुरवठा अधिकारी, भिवंडी तहसिलदार कार्यालय, भिवंडी. जि. ठाणे, राह. बी/205, दुसरा माळा, मयुरपंख सोसायटी, कळवा, जि.ठाणे यांना अँन्टी करप्शन ब्युरो, ठाणे कडील पो.नि. सुरेश चोपडे व त्यांचे पथकाने 13.09 वा लाचेच्या रकमेसह रंगेहाथ पकडले आहे, म्हणुन माझी त्यांच्याविरूध्द भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियमान्वये कायदेशीर फिर्याद आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

**or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):
पोनि। सुरेश चोपडे
**Rank** (पद): I (Inspector) **No.**(क्र.):
**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

**Attachment to item 7 of First Information Report (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र): Physical features, deformities and other details of the ( If known / seen )(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील))**

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म तारीक/ वर्ष) | Build (बांधा) | Height (cms.) (उंची(सें. मी.)) | Complexion (रंग) | Identification Mark (s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | महिला | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा / बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच्या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
**(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)**

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
**(**तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा**):**

15. **Date and time of dispatch to the court**
**(**न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ**):**

**Signature of Officer in charge, Police Station**
**(**ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी**)**

**Name (**नांव**):** SHANKAR ANANDRA
**Rank(**पद**):** I (Inspector)
**No.(**सं.**):**